# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- 17/02/2018

## बिरसा मुंडा व्हॉलीबॉल सामन्यात चढली रंगत

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सा◌ो. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दल व्दारा आयोजीत बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा- 2018 या पोलीस स्टेशन, उपपोलीस स्टेशन, पोलीस मदत केंद्र स्तरावर भरविण्यात आल्या. या स्पर्धेला आदिवासी युवकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

गडचिरोली पोस्टे, उपपोस्टे, पोमके स्तरावर अत्यंत चुरशीची सामने पार पाडले. यामध्ये विजेत्या संघांना उपविभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत प्रवेश मिळाला. आज उपविभागीय स्तरावरचे सामन्यांचा निकाल लागून प्रत्येक उपविभागातून खालील 10 संघ विजयी झाले. 1) जिल्हा प्रबोधनी गट क- गडचिरोली 2) राणाप्रताप व्हॉलीबॉल टिम- कुरखेडा 3) मा. धंतेश्वरी व व्हॉलीबॉल क्लब- धानोरा 4) आदिवासी युथ क्लब- गट्टा (फु) 5) नागेपल्ली व्हॉलीबॉल संघ 6) आर. आर. व्हॉलीबॉल मंडळ बुर्गी 7) येमली व्हॉलीबॉल संघ 8) गुंडूरवाही व्हॉलीबॉल संघ 9) बंजारा सि. सि ग्रुप छल्लेवाडा 10) बिरसा मं◌ुडा संघ- असरअल्ली या 10 संघाचे सामने उदया पोलीस उपमुख्यालय अहेरी येथील पोलीस मैदानावर सुरू होत असून जिल्हा भरातून निवडल्या गेलेल्या या संघाना अ आणि ब या दोन गटात प्रत्येकी 5 संघ अशी विभागणी करण्यात आली असून साखळी पदधतीने त्यांचे सामने

होणार आहेत. यात सर्वात उत्तम 8 संघ निवडण्यात येणार असून त्या 8 संघांचे सामने गडचिरोली येथे होतील. आज पर्यंत अत्यंत चुरशीचे आणि उत्साहाने पार पाडलेल्या या स्पर्धेला या साखळी पदधतीच्या भरवलेल्या सामन्यामुळे अधिकच रंगत आली आहे.